**<u>ठळक बातम्या</u>**

- मालदीव दौरा आटोपून प्रधानमंत्री दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी तमिळनाडूमधल्या तुतिकोरिन इथं पोहोचले

- देशभर कारगिल विजय दिनानिमित्त विविध कार्यक्रमातून कारगिल हुतात्म्यांना अभिवादन

- सरन्यायाधीशपदावरुन निवृत्त झाल्यावर कोणतंही शासकीय पद स्वीकारणार नसल्याचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं स्पष्ट

**आणि**

- महाराष्ट्रात बहुतांश भागात पावसाचा जोर / ठिकठिकाणी पाणीसाठ्यात वाढ

**<><><><>**

मालदीवचा दोन दिवसांचा यशस्वी दौरा संपवून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परतले. प्रधानमंत्री आज संध्याकाळी दोन दिवसांच्या तमिळनाडू दौऱ्यासाठी तुतिकोरीन इथं पोहोचले. ४ हजार ६०० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

मालदीवच्या ६० व्या स्वातंत्र्य दिनाच्या समारंभात 'मुख्य अतिथी' म्हणून प्रधानमंत्री सहभागी झाले होते. दोन्ही देशांच्या मैत्रीपूर्ण संबंधांच्या इतिहासात पहिल्यांदाच भारतीय प्रधानमंत्री मालदीवच्या स्वातंत्र दिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाल्याचं पाहायला मिळालं.

अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

- **- होल्ड व्हाईस कास्ट - -**

- **<><><><>**

देशभर आज कारगिल विजय दिवस साजरा होत आहे. **राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी आज कारगिल विजय दिनानिमित्त देशासाठी बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांना आदरांजली वाहिली.

देशाच्या आत्मसन्मानाचं रक्षण करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या भारत मातेच्या वीर सुपुत्रांचं आपण स्मरण करतो असं **प्रधानमंत्री** नरेंद्र मोदी यांनी कारगिल विजय दिनानिमित्त संदेशात म्हटलं आहे.

**संरक्षण मंत्री** राजनाथ सिंह यांनी आज कारगिल विजय दिना निमित्त नवी दिल्ली इथल्या राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून वीर जवानांना आदरांजली वाहिली. **लष्करप्रमुख** जनरल उपेंद्र द्विवेदी, संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह, संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान, हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए पी सिंग आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांनीही आज कारगिल विजय दिनानिमित्त देशाच्या वीर जवानांना आदरांजली वाहिली.

**महाराष्ट्राचे** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी कारगिल विजय दिनानिमित्त समाजमाध्यमावरून हा विजय साकार करणाऱ्या सर्व अधिकारी आणि जवानांना नमन केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारगिल विजय दिवसानिमित्त समाजमाध्यमावरून आदरांजली वाहिली. मातृभूमीच्या रक्षणासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या भारतीय लष्कराचा गौरवशाली इतिहास सांगणारा हा दिवस असल्याचं त्यांनी नमूद केलं.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही जवानांना आदरांजली वाहिली.

**<><><><>**

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवालाविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी होणार आहे. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांच्या पीठासमोर ही सुनावणी होईल. न्यायमूर्ती वर्मा यांच्या दिल्ली इथल्या शासकीय निवासस्थानी मोठ्या प्रमाणात बेहिशोबी रोख रक्कम आढळून आली होती. कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसताना या प्रकरणाची अंतर्गत चौकशी केल्यामुळे ती अयोग्य आणि अवैध आहे, असा दावा न्यायमूर्ती वर्मा यांनी केला आहे. तसंच या प्रकरणी माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी न्यायमूर्ती वर्मा यांना उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदावरून काढून टाकण्याची शिफारस केली होती. ही शिफारस

घटनाबाह्य आणि अधिकारकक्षेबाहेरची आहे, असं जाहीर करण्याची मागणी न्यायमूर्ती वर्मा यांनी याचिकेद्वारे केली आहे.

<><><><>

झारखंडच्या गुमला जिल्ह्यात आज सकाळी पोलिसांशी झालेल्या चकमकीत जनता जन मुक्ती पार्टी या बंदी घातलेल्या नक्षलवादी संघटनेचे तीन सदस्य ठार झाले. या तिघांचे मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेतले. तसंच या ठिकाणावरून एके-४७ आणि इनसास रायफल्सही जप्त केल्या.

<><><><>

छत्तीसगडमधल्या बस्तर प्रदेशात कार्यरत असलेल्या एका नक्षल जोडप्याने आज विजयवाडा पोलिसांसमोर शरणागती पत्करली. जोरीगे नागाराजू आणि मेदका ज्योतिश्वरी अशी या नक्षलींची नावं आहेत. हे जोडपं गेल्या ३४ वर्षांपासून नक्षळी चळवळीत कार्यरत होतं.

<><><><>

सरन्यायाधीशपदावरुन निवृत्त झाल्यावर आपण कायदेविषयक सल्ला- मार्गदर्शन आणि लवाद या पर्यायी तंटा निवारण व्यवस्थेसाठी काम करणार असून कोणतंही शासकीय पद स्वीकारणार नाही, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी सांगितलं आहे. अमरावती जिल्हा आणि सत्र न्यायालयात टी. आर. गिल्डा स्मृती ई-लायब्ररी'चं उद्घाटन करताना आज ते बोलत होते. या ई वाचनालयामुळे वकीलांना कायदेशीर संदर्भ, निर्णय आणि लेख त्वरित उपलब्ध होतील. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि इतर न्यायाधीश तसंच इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

सरन्यायधीश गवई यांनी काल अमरावती जिल्ह्यात दर्यापूर या त्यांच्या मूळ गावी जाऊन दिवंगत रा.सु.गवई यांच्या स्मारकापाशी अभिवादन केलं. तसंच दर्यापूरच्या स्थानिक न्यायालयाच्या नवीन इमारतीचं उद्घाटन केलं.

<><><><>

महाराष्ट्रात बहुतांश जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढला असून विविध धरणांमधल्या पाणीसाठ्यात झपाट्यानं वाढ होत आहे. मुंबई आणि उपनगरांत आज सकाळपासून पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी कोसळत होत्या. **रायगड** जिल्ह्यात ताम्हिणी घाट आणि

घाटमाथ्यावर जोरदार पावसामुळे सावित्री नदीनं इशारा पातळी ओलांडली आहे. **गोंदिया** जिल्ह्यात संततधारेमुळे अनेक भागांतल्या नद्या, नाले तुडुंब भरून वाहत आहेत. **सातारा** जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर वाढल्यानं धरणांमधली पाणीपातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी कोयनेसह पाच धरणांतून सकाळपासून पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. **सांगली** जिल्ह्यात वारणा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी होत असल्यानं पाणीपातळीत वाढ झाली आहे. **कोल्हापूर** जवळच्या राधानगरी धरणाचे चार स्वयंचलित दरवाजे उघडले असून भोगावती आणि पंचगंगा नदी काठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. **नांदेड** जिल्ह्यात आज दुपारपासून पावसाचा जोर वाढल्यामुळे विष्णुपुरी प्रकल्प ९३ टक्के भरला आहे. **गडचिरोली** जिल्ह्यात मुसळधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. **जालना** शहरासह जिल्ह्यात आज पहाटेपासून ढगाळ वातावरण असून पावसाची संततधार सुरू आहे.

हवामान विभागानं आज पालघर, पुणे, सातारा आणि अमरावती या चार जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला आहे. तर मुंबई शहर आणि उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, अकोला, यवतमाळ, नागपूर आणि गोंदिया या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**<><><>**

माजी केंद्रीय मंत्री पी. अशोक गजपती राजू यांनी आज गोव्याच्या राज्यपाल पदाची शपथ घेतली. पणजी इथं राजभवनात झालेल्या समारंभात त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी त्यांना पदाची शपथ दिली. पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी या महिन्याच्या सुरुवातीला गोव्याच्या राज्यपाल पदाचा आपला कार्यकाळ पूर्ण केला.

**<><><>**

इस्रो आणि नासा यांचा पहिला संयुक्त उपग्रह निसार मोहिमेचं प्रक्षेपण ३० जुलैला होणार आहे. हा उपग्रह भारतीय रॉकेटद्वारे ३० जुलैला संध्याकाळी ५ वाजून ४० मिनिटांनी आंध्र प्रदेशात श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपित केला जाईल. हा उपग्रह दर १२ दिवसांनी संपूर्ण पृथ्वीच्या पृष्ठभागाचे उच्च-रिझोल्यूशनचे फोटो प्रदान करेल. हा उपग्रह पृथ्वीच्या समुद्राच्या पातळीचे निरीक्षण करणे, जहाजे शोधणे, वादळांचे

निरीक्षण करणे, मातीतील ओलाव्यातील बदल, पृष्ठभागावरच्या जलसंपत्तीचे मॅपिंग आणि आपत्ती व्यवस्थापन यासारख्या अनेक महत्त्वाच्या क्षेत्रात मदत करेल.

<><><><>

टेमा इंडियाने जड पाण्याच्या उर्ध्वपातनासाठी भारतातल्या पहिल्या खाजगी चाचणी सुविधेचं आज अनावरण केलं. जड पाण्याच्या ऊर्धपातन घटकांसाठी चाचणी करण्याची सुविधा आतापर्यंत बीएआरसी पर्यंत मर्यादित होती.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १२४ वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, युट्यूब वाहिन्या, संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲपवरून या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

//<><><><>//